MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



## बीड जिल्हा शल्य चिकित्सकपदी डॉ अशोक थोरात

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयाच्या जिल्हा शल्य चिकित्सक पदी डॉ अशोक थोरात यांची पुन्हा नियुक्ती करण्यात आलेली आहे डॉअशोक थोरात हे मूळचे बीड जिल्ह्यातील रहिवासी असून त्यांनी या अगोदर सुद्धा बीड जिल्हा रुग्णालयांमध्ये जिल्हा शल्य चिकित्सक पदावरती काम करत आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे बीड जिल्ह्यातील अनेक राजकीय सामाजिक नेतेमंडळी व बीड जिल्ह्यातील जनतेच्या शेवटच्या घटकापर्यंत डॉ अशोक थोरात यांच्या कार्याची ओळख आहे अशोक थोरात हे या अगोदर बीड जिल्हा रुग्णालयात होते त्यामुळे आता बीड जिल्हा चांगले दिवस नक्कीच येतील अशी अपेक्षा बीड जिल्ह्यातील जनतेला डॉ अशोक थोरात यांच्याकडून आहे डॉ अशोक थोरात यांच्या निवडीनंतर आज बीड जिल्हा रुग्णालयामध्ये जिल्हा शल्य चिकित्सक पदाचा प्रभाव स्वीकारला आहे त्याबद्दल त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१४ | मंगळवार दि.०१ ऑक्टोबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -14 | TUESDAY DT.01 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# गुलाबी गाडी गुलाबी जॅकेट क्या बात क्या बात पण मोकळ्या रस्त्यालाच दादानं दाखवला हात..!




## अजित पवारांच्या जनसंवाद यात्रेत मराठा आंदोलकांवर केलेल्या

# आमदार प्रकाश सोळंकेनी खोट्या गंभीर ३०७ च्या गुन्ह्यामुळे परिणाम?

बीड प्रतिनिधी-

माजलगाव मध्ये आमदार सोळंकेच्या कार्यकर्त्यांनी जयसिंह सोळंकेला डावल आमदार प्रकाश दादा सोळंके यांचे अनेक कार्यकर्ते जनसंवाद यात्रेमध्ये दिसून आले नाहीत. आमदार प्रकाश सोळंकेनी जयसिंह सोळंकेची उमेदवारीची घोषणा जरी केली असली तरी आमदार प्रकाश सोळकेचे कार्यकर्ते मात्र जयसिंह सोळंकेना विरोध करत आहेत. आजच्या माजलगाव येथील महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे अध्यक्ष अजित पवार हे आज बीड जिल्हा दौऱ्यावर आहेत. तर यावेळी त्यांनी माजलगाव मतदार संघामध्ये जनसंवाद यात्रा घेऊन येत असताना मात्र आता नवीन चित्र पाहायला मिळालं आहे.यावेळी आमदार प्रकाश सोळंके जयसिंह सोळंकेनी मराठा आंदोलकांवरती अनेक ३०७ गुन्हे दाखल केले होते. त्या गुन्ह्याच्या अनुषंगाने ३०७ मुळे अनेक तरुणांची शैक्षणिक जीवन उध्वस्त झालेले आहे.यामध्ये अठरापगड जातीचे लोक यांनी आमदार प्रकाश सोळंके कडे जाण्यास पाठ फिरवली आहे. तर विशेष पाहता मराठा आंदोलकांनी जनसंवाद यात्रेकडे जाण्यास टाळले तर आमदार प्रकाश सोळंके यांचे कार्यकर्ते हे जयसिंह सोळंकेला नेता म्हणून स्वीकाराला तयार नाहीत. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये माजलगाव मतदार संघात अजित पवारांचं सीट धोक्यात असल्याची चर्चा माजलगाव मध्ये आहे.

माजलगाव मतदार संघात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जनसंवाद यात्रा घेऊन येत असताना माजलगाव शहरांमध्ये आल्यानंतर अजित पवार पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी भाषण केले यामध्ये त्यांनी प्रकाश सोळंके किंवा भावी आमदार जयसिंह सोळुंखे यांचे नाव घेतलेच नाही परंतु त्या ठिकाणी जनतेला अजित पवार म्हणाले की तुमच्या मनातील व्यक्तीच आमदार होईल परंतु नेमका व्यक्ती कोण आहे. कारण प्रकाश सोळंके व जय सिंह सोळंके यांचे नाव न घेता जर अजित पवार तुमच्या मनातील व्यक्तीच आमदार होईल असं तो व्यक्ती जनतेच्या मनातील कोण आहेत तर यावेळी रमेश आडसकर यांच्या किंवा मोहन दादा जगताप यांच्या नावाची चर्चा सध्या माजलगाव मध्ये जोरदार आहे.

माजलगाव मतदार संघामधून आमदार प्रकाश सोळंके व भावी आमदार जयश्री सोळंके यांनी अनेक गावांमध्ये जाऊन गाठीभेटी दौरा केला त्यावेळी अनेक दिग्गज कार्यकर्त्यांनी त्यांच्या भेटी नाकारल्यावर त्या भेटीसाठी गावांमध्ये गेल्यानंतर दोघात चुलत्या पुतण्यांना न भेटताच कार्यकर्ते बाहेर निघून गेले तर काहींनी गाड्यांची व्यवस्था करा जेवणाची व्यवस्था करा कार्यकर्त्यांना खर्च पाण्याची व्यवस्था करा या सर्व गोष्टी आमदार प्रकाश सोळंके व जयसिंह सोळंके यांनी मान्य केल्या खऱ्या परंतु लोकांनी पैसे घेतल्या गाड्या घेतले परंतु कार्यक्रमाला गेलेच नाही. त्यामुळे माजलगावच्या आजच्या अजित पवारांच्या जनसंवाद यात्रेला गर्दी मनाव्ह तेवढी नव्हतीच अशीही चर्चा माजलगाव मतदार संघात ऐकायला येत आहे परंतु आजच्या परिस्थितीमध्ये पाहिले तर आमदार प्रकाश सोळंके असतील किंवा जयसिंह सोळंके असतील यांचे सीट पडल्यात जमा आहे त्यामुळे अजित पवारांनी आता नवीन पर्याय शोधल्याशिवाय त्यांचं माजलगाव मधील सीट टिकणार नाही ही गोष्ट मात्र निश्चित आहे.

अजित पवारांच्या जन संवाद यात्रेवर मराठा आंदोलकांवर केलेल्या आमदार प्रकाश सोळंकेनी खोट्या ३०७ च्या गंभीर गुन्ह्यामुळे परिणाम?
३०७ सारखे खोटे गुन्हे दाखल करून आमदार प्रकाश सोळंकेनी मराठा आंदोलकांनी केलेल्या मराठा आंदोलनातील जाळपोळत निष्पाप तरुण आरोपीना आ.प्रकाश सोळंकेन हात जोडले कार्यक्रमाला येण्यास विनवण्या केल्याची चर्चा माजलगाव मतदार संघात?
माजलगाव मधील जनतेने उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या जनसंवाद यात्रेच्या कार्यक्रमाला जाणे टाळलं गर्दी दिसली नाही चुलत्या पुतण्याचे धाबे दणाणले?
माजलगाव मतदार संघातील उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या जनसंवाद यात्रेला पब्लिकच म्हणावं तेवढी आलीच नाही.?

- सोळंके परिवारांनी अजून सुद्धा गुलदस्त्यात ठेवलेला आहे प्रकाश दादा का जयसिंह सोळंके
- कोण लढणार हे मात्र अजूनही निश्चित नाहीच?
- माजलगाव मतदार संघामध्ये दलित मुस्लिम समाजाचे मतदान ऐतिहासिक निर्णय घडवणार.?
- पालकमंत्री धनंजय मुंडे अजित पवार यांनी प्रकाश सोळंके जयश्री सोळंकेचं नावही भाषणामध्ये न घेतल्यामुळे माजलगाव मध्ये चर्चेला जोर?

महाराष्ट्रामध्ये विधानसभा निवडणुकीत पार्श्वभूमीवर सर्व पक्षांकडून मोर्चे बांधणी सुरू आहे साधारणपणे तीन घटक पक्षात जास्तीत जास्त जागा आपल्या पक्षाला कशा मिळतील यासाठी प्रयत्न सुरू आहेत ज्या मतदारसंघात ज्या पक्षाचा आमदार आहे त्याच पक्षाला जागा देण्याचा फार्मूला निश्चित झाला असल्याचे चित्र जवळपास स्पष्ट होत असतानाच मात्र माजलगाव मध्ये प्रकाश सोळंके व जयसिंह सोळंके चुलते पुतणे यांचा पराभव निश्चित मानला जात आहे परंतु पक्षाने निवडून येण्याची एकूण परिस्थिती चा अहवाल हा सर्वेस्वार रिपोर्टही पाहणे गरजेचे आहे. जयसिंह सोळंकेना उमेदवारी दिली तर चुलत्या पुतण्या दोघेही पडण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादीची एक जागा गेल्यात जमा आहे.

माजलगाव मतदार संघामध्ये मराठा आंदोलकांमध्ये खोटे गुन्हे दाखल करत असताना राजकीय द्वेष आमदार प्रकाश दादां सोळंके नी पुढे आणला त्यावेळी मागासवर्गीय समाजातील कार्यकर्त्यांनाही ३०७ सारखे गुन्ह्यांमध्ये जेलमध्ये जावा लागले जेलमध्ये जात असताना मराठा आंदोलकांमध्ये जास्त करून दलित मुस्लिमांचे कार्यकर्ते असल्याचे माजलगाव शहरांमध्ये बोलले जात आहे ?त्यामुळे प्रकाश सोळंकेने ३०७ च्या गुन्ह्याची अगोदर जनतेला माफी मागूनच २०२४ च्या उमेदवारीचा आमदार प्रकाश सोळंके असतील किंवा प्रकाश सोळंकेचे पुतणे जयसिंह सोळंके असतील त्यांनी जनतेची माफी मागावी अशी मागणी मतदारसंघातून होत आहे

# बाभुळवाडीत पोहचला रथ; ३८५ नागरिकांची केली तपासणी करुन दिले मोफत औषधोपचार, गावकर्यांनी मानले आभार






बीड तालुक्यात एकनाथ आरोग्य रथाने मारली बाजी!
भावी आमदार बाजीरावभैय्या चव्हाण मतदार संघात निर्माण झाली जनभावना
स्व:खर्चातून गोरगरिब रुग्णांसाठी चव्हाण यांनी सुरु केली जिल्हाभरात आरोग्य रथयात्रा
मुख्यमंत्री वैदकीय साह्यता निधीतून तब्बल ९ कोटी ८० लाख रुपयांची मिळवून दिली मदत
जिल्ह्यातील गोरगरिब सातशेच्या वर रुग्णांसह नातेवाईकांना मिळाला दिलासा

बीड । प्रतिनिधी

राज्याचे लाडके मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या मुख्यमंत्री वैद्यकीय साह्यता निधीतून दुर्धर आजाराने त्रस्त असलेल्या बीड जिल्ह्यातील गोरगरिब रुग्णांना बाजीरावभैय्या चव्हाण यांनी तब्बल ९ कोटी ८० लाख रुपयांची मदत मिळवून देत सुमारे सातशेच्यावर रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना दिलासा दिला आहे. तसेच बीड तालुक्यासह जिल्ह्यातील जनतेच्या उत्तम आरोग्यासाठी स्वत: चव्हाण यांनी स्व:खर्चातून एकनाथ आरोग्य रथ यात्रेला सुरवात केली असून ही रथयात्रा गावागावात पोहचून ग्रामीण भागातील रुग्णांना जाग्यावर मोफत आरोग्य सेवा देण्याचे कार्य करत आहेत. बाजीराव चव्हाण यांनी जिल्ह्यात सुरु केलेला आरोग्याच्या महायज्ञाचा सर्व सामान्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होऊ लागला आहे. त्यामुळे बीड मतदार संघात या आरोग्य रथाने बाजी मारली असून बीडचा भावी आमदार म्हणून बाजीराव चव्हाण अशी जनभावना मतदारसंघात निर्माण झाली आहे. सर्व सामान्य लोक व्याधीने त्रस्त असातांनाही पैश्यां अभावी त्यांना उपचार घेणे मुश्किल होते. त्यामुळे संपूर्ण कुटुंब नैराश्यात येवून खच्चून जाते. गोरगरिबांना देखील उत्तम आरोग्य सेवा मिळावी. म्हणून रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना आधार देण्यासाठी शिवसेना शिंदे गटाचे युवा सेनेचे मराठवाडा निरक्षक तथा धर्मवीर प्रतिष्ठानचे राज्यध्यक्ष बाजीराव चव्हाण पुढे सरसावले. मुख्यमंत्री वैद्यकीय साह्यता निधीच्या माध्यमातून दुर्धर आजाराने त्रस्त असलेल्या सुमारे सातशेच्या वर रुग्णांना योजनेचा लाभ मिळवून देत तब्बल ९ कोटी ८० लाख रुपये मिळवून दिले. त्यामुळे आज शेकडो रुग्ण व्याधी मुक्त झाले असून रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांच्या चेहर्यावर हास्य फुलवले आहे. त्यामुळे बाजीराव चव्हाण गोरगरिबांचे कैवारी पालनहार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय साह्यता योजनेवरच अवलंबून न राहता बाजीराव चव्हाण यांनी स्व:खर्चातून जिल्ह्यातील सर्व सामान्य जनतेसाठी एकनाथ आरोग्य सेवा रथाचा संकल्प करुन आज हा रथ जिल्ह्यातील गावा-गावात जावून गोरगरिबांना मोफत आरोग्य देण्याचे उदात कार्य करत आहे. दरम्यान बीड तालुक्यातील बाभुळवाडी गावात हा आरोग्य सोमवारी (दि.३०) पोहोचल्यानंतर शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे बीड जिल्हाप्रमुख महादेव मातकर यांनी स्वत: गावातील अनेक आजाराने त्रस्त असलेल्या अबालवृद्धांना घेवून या आरोग्य रथाचा लाभ मिळवून दिला. यावेळी साधारणत: ३५० ग्रामस्थांच्या तपासणी डॉ. हरिदास करंडे, डॉ.पवन जाधव यांनी केली तर आरोग्य सेवक पंकज कदम, ज्योतीराम फरतडे, रुग्णवाहिकेचे चालक गणेश नेवाळे यांनी त्यांना सहकार्य केले. यावेळी रुग्णांना मोफत औषधी गोळ्यांचे वाटप करण्यात आले. गावातील व्याधीने त्रस्त असलेल्या रुग्णांना घरबसल्या आरोग्यसेवा मिळू लागल्याने बाजीराव चव्हाण आणि महादेव मातकर यांच्यासह त्यांच्या सर्व सहकार्यांचे आभार मानले जात असून खर्या अर्थाने आज एकनाथ आरोग्य रथ जिल्ह्यातील सर्व सामान्यांच्या चेहर्यावर हास्य फुलवू लागला आहे.

# जयदत्तअण्णां क्षीरसागरांच्या होम मिनिस्टरचे अनुकरण करण्यापेक्षा विकासाचे अनुकरण करा-जयश्रीताई विधाते

आजही महिलांचा प्रचंड प्रतिसाद

बीड /प्रतिनिधी

माजीमंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागरच्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ या लोकप्रिय कार्यक्रमाचे अनुकरण करण्यापेक्षा विकासाचे अनुकरण केले असते तर बीड जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलून गेला असता असे प्रतिपादन जयदत्त अण्णा क्षीरसागर विकास मंचाच्या महिला आघाडी प्रमुख सौ.जयश्रीताई विधाते यांनी केले.



त्या काकू नाना प्रतिष्ठान आयोजित माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा हा कार्यक्रम बी.एच. एम .एस. कॉलेज प्रांगणात आयोजित अकराव्या प्रयोगाच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. या प्रसंगी व्यासपीठावर सौ.पुष्पाताई पांगारकर,डॉ.सौ. मीना भस्मे ,सौ.सुजाता माने,सौ. वनिता इंगोले,सौ. प्रतिभा चैतन्य,सौ. शोभा काळे,सौ. दिपाली दुसाने,सौ. विजया राख,सौ. ह. भ. प. उषा मुंडे सौ.शारदा धुरंदरे,सौ. रजनी कदम,सौ. रुक्मिणी नागापुरे डॉ. सौ.घुगे, सौ.मनीषा गुंजाळ सौ.दैवशाला स्वामी सौ.जयश्रीताई राऊत सौ.कीर्तीताई पांगरकर,सौ. भारतीताई क्षीरसागर,सौ. सुशीलाताई नाईकवाडे,सौ. सविताताई काळे आदी मान्यवर महिलांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन संपन्न झाले. पुढे बोलताना जयश्रीताई विधाते म्हणाल्या की, महिला भगिनींना हर्ष, उल्हास, आनंद घेण्याची संधी जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या या लोकप्रिय उपक्रमाने मिळवून दिली दररोज व्यस्ततेतुन थोडी उसंत मिळावी आणि स्वतःसाठी जगता यावे म्हणून महिला दररोज मोठ्या प्रमाणात सहभागी होत आहेत. याचे सर्व श्रेय काकू- नाना प्रतिष्ठान आणि जयदत्त अण्णा क्षीरसागर साहेब यांना जाते असेही त्या म्हणाल्या. याप्रसंगी कीर्तीताई पांगारकर साळुंखे म्हणाल्या की, स्वतःसाठी जगता यावं आपलं हरवलेलं बालपण पुन्हा मिळवीता यांव, बालपणीचे क्षण अनुभवता यावेत यासाठी होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञ २०२४ हे व्यासपीठ माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर आणि काकू नाना प्रतिष्ठान यांनी उपलब्ध करून दिले आणि आम्हाला दिवाळीच्या आधी भाऊबीजेची भेट दिली आहे.असे त्या म्हणाल्या. या कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवर महिलांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रत भाग्यवान मानाच्या पैठणीची विजेती सौ. कांचन शिवम साळुंखे द्वितीय इमिटेशन ज्वेलरीच्या मानकरी विजेत्यां सौ. विद्या परमेश्वर पवळ तर तृतीय विजेत्या चौरंगाच्या मानकरी सौ. आयोध्या मधुकर पवार या ठरल्या आहेत.तर उर्वरित सात महिलांना गिफ्ट हॅम्पर देण्यात आले.यामध्ये सौ. सीमा किशोर देशमुख,सौ. कल्याणी अभिषेक राऊत,सौ. विद्या परशुराम आरसुळ,सौ. दिपाली सचिन लवुळ, सौ.योगिता अमोल मुळूक ,सौ.ज्योती महेंद्र मुंडे सौ.सुरेखा अभय पवार या मानकरी ठरल्या कार्यक्रमात बक्षिसाचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विजेत्या सर्व महिलांची ७ ऑक्टोबर रोजी बी एच.एम.एस. कॉलेज येथे होणाऱ्या खेळ पैठणीचा महाराष्ट्रातील फेम प्रसिद्ध निवेदक क्रांती नाना माळेगावकर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे .यासाठी सर्व महिलांची निवड झाली आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयदत्त अण्णा क्षीरसागर विचार मंचाचे सर्व नगरसेवक कार्यकर्ते यांनी हा कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमाचे खेळात रंगुन वय विसरायला लावणाऱ्या बहारदार सूत्रसंचालन विनोदाचे बादशहा महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध निवेदक सुरेशभाऊजी अर्थात निवेदक सुरेश साळुंकेंनी केले .या कार्यक्रमास आबाल वृद्ध महिलांची बहुसंख्येने उपस्थिती होती.



## सोयाबीन, उडीद व मुग पिकाचे हमीभाव केंदे तात्काळ चालू न केल्यास तीव्र आंदोलन-तालुकाप्रमुख गोरख सिंघन

आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मराठवाडा संपर्क नेते सुनिल प्रभू साहेब, उपनेत्या सुषमाताई अंधारे,संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना तालुकाप्रमुख गोरख सिंघन, यांनी शिवसेना जिल्हा सचिव श्रीकृष्ण गायके, शेतकरी सेनेचे युवा नेते भिमराव कुटे, माजी सरपंच रामनारायण जाधव,व अंथरवणपिंपरी येथील शेतकरी रामप्रसाद शिंदे यांच्या समवेत जाऊन जिल्हा निबंधक कार्यालयात जाऊन सहायक उपनिबंधक कदम साहेब यांची भेट घेऊन बाजार समितीचे हमी भाव खरेदी केंद्र चालू करून शासनाचा हमी भाव देण्यात यावा व शेतकऱ्यांनाची व्यापाऱ्यांनी चालवलेली लुट तात्काळ थांबवावी असे निवेदन दिले व खरेदी केंद्र चालू न झाल्यास जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेनेचे तालुकाप्रमुख गोरख सिंघन यांनी दिला आहे.

# बाले पीर अजमेर नगर आमराई भागातील समस्या मार्गी लावा

## खमरोद्दीन यांचे आजी- माजी आमदाराकडे साकडे

बीड ।बीड शहरातील बालेपीर भागातील बीड नगर परिषद क्षेत्र अंतर्गत एकनाथ नगर आदित्य नगर ज्ञानेश्वर नगर अमराई अजमेर नगर शेख शौकत सर यांची गल्ली अतिक सर सर यांची गल्ली आदी परिसर येत असून या भागातील रस्त्याची मागील अनेक दिवसापासून अत्यंत दयनीय अशी अवस्था झाली आहे त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे ही गंभीर बाब असून याकडे गंभीर्याने लक्ष देऊन रस्ते नाल्याचे कामे सुरू करण्याकरिता शासन दरबारी पाठपुरावा करावा अशी मागणी बीड जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाचे शहराध्यक्ष महमद खमरोद्दीन यानी आ. सदिप क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम यांच्याकडे केली आहे



महमद खमरोद्दीन यानी म्हटले आहे की बालेपीर उत्तर बाजू अमराई अजमेर नगर अमन पार्क हजरत बिलाल मस्जिद परिसर आदित्य नगर भागातील रस्त्यावर पावसाळ्यात मोठ मोठे खड्डे निर्माण होतात त्यामुळे कित्येक दुर्घटना सुद्धा घडत असतात मागील काही वर्षापासून या भागातील रस्ते नाल्या याकडे लोकप्रतिनिधी व न प प्रशासन यांचे दुर्लक्ष होत असल्याने दिसून येत आहे त्यामुळे नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन या रस्त्याने वावर करावा करावा लागत आहे या भागातील नागरिक दररोज शासकीय कामे व बाजारपेठेत येतात परंतु या खड्ड्यामुळे त्यांना सुद्धा मनस्ताप सहन करावा लागतो याच रस्त्याने शालेय विद्यार्थी सुद्धा शाळेत जातात सदर बाब गंभीर असून याकडे गंभीर्याने लक्ष घालावे अमन पार्क तोहीद मस्जिद परिसरात विद्युत पोल नसल्याने येथील नागरिकांना विजकरिता लाकडी बांबूचा वापर करत असल्याने विद्युत पोल उभारणी करून पाण्याची पाईपलाईन टाकून पाणी पुरवठा करण्यात यावा या भागातील नागरिकाची अडचण पाहता या भागातील रस्ते नाल्या पाण्याची विद्युत पोलसह नागरी सुविधा साठी शासन दरबारी पाठ पुरावा करून निधी उपलब्ध करून घ्यावा अशी मागणी महमद खमरोद्दीन यांनी आमदाराकडे केल्या

# स्वच्छता शिपाई व कर्मचाऱ्यां ची पुढाऱ्यांच्या मै बडा का तू बडा यामुळे उपासमारीची वेळ आली यासाठी ग्रामपंचायत कार्यालयासमोर ठिय्या उपोषण

सिरसाळा/ बापू किरवले

दिनांक . १. शिरसाळा ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी साफसफाई चालू आहे व कामगार व कर्मचाऱ्याचा उपोषण थकीत मागील बिलासाठी करण्यात येत आहे तरी यावर्षी या कामगारांची दिवाळी मागील बाकी थकीत. रुपये बिल .९२९२९४.०० व चालू वेतन देण्यासाठी टाळाटाळ होत असले दिनांक.३०.०९.२०२४. पासून ग्रामपंचायत कार्यालय समोर सर्व कर्मचारी काम बंद आंदोलन बेमुदत धरणे आंदोलन करत असल्याबाबत ग्रामपंचायत कार्यालयाला रोजी पत्र देऊन थकीत वेतना संदर्भात पर्यंत केलेले उपोषणाचे दिलेले पत्र रोजी माननीय गट विकास अधिकारी यांच्या पंचायत समिती परळी वैजनाथ व माननीय सरपंच ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत शिरसाळा यांना दिलेल्या दुसरे पत्र अधिकारी पंचायत परळी वैजनाथ यांचे वेतन अदा करणे या संदर्भात शिरसाळा ग्रामपंचायत कार्यालय समोर बेमुदत उपोषण करण्यात येत आहे तरी साफसफाई कामगार व कर्मचाऱ्यांचा मागील वेतन व चालू वेतन लवकरात लवकर देऊन




कामगारांच्या दिवाळी सुखी व आनंदामध्ये करण्यात यावी त्यासाठी विनंती केली आहे व साफसफाई कामगारा तर्फे ग्रामपंचायत सरपंच ग्रामसेवक गटविकास अधिकारी पंचायत समिती परळी वैजनाथ यांना निवेदनाद्वारे करण्यात आले आहे या उपोषणाला पाठिंबा म्हणून .माजी .सरपंच .राम किरवले यांनी काल पाठिंबा दिला आहे यावेळी त्यांच्यासोबत रणजीत रोडे संभाजी आरसुळे बंडू ताटे उत्तम लोखंडे सर्व उपस्थित राहून आमच्या मागण्या ऐकून घेऊन त्यांनी या मागण्याचा मी स्वतः आपल्या बीड जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय धनंजय मुंडे साहेब यांना सविस्तर बोलून तुमच्या या मागण्याचे काही ना काहीतरी मार्ग काढू असे सांगून त्यांनी आमच्या या आंदोलनाला पाठिंबा दिला या पाठिंबाच्या आलेल्या सर्वांचेच आम्ही सर्वांनी आभार मानले व या साफसफाई कामगार कर्मचारी या उपोषणामध्ये सहभागी झाले आहेत सदरील रक्कम पूर्तता करण्यात आलेली नाही पूर्ण रक्कम न्यायालयीन प्रकरण वगळता ३१ मार्च २०१४ अखेर.१४.५७५००/ आता केले जाईल असे ग्रामपंचायत वतीने आता केले जाईल असे वरील संदर्भ दोनचे पालन करून वारंवार समरण पत्राद्वारे विनंती केली असता माननीय गट विकास अधिकारी यांना गट क्रमांक पाच चे आदेशाचे ग्रामपंचायत शिरसाळा याने पालन केलेले नाही कर्मचाऱ्यावर व साफसफाई कामगारावर अतिशय अन्याय करणारी बाब आहे. या उपोषणाला उपस्थित कर्मचारी आहेत . .नंबर एक.

१. विश्वंभर गोपाळराव देशमुख ( कारकून )

कानोबा लक्ष्मण काळे पाणीपुरवठा बालासाहेब तुळशीराम घनगाव शिपाई कौशल्य बालासाहेब घनगाव स्वच्छता शिपाई सलमान आयुब खान पठाण चालक अहमद पठाण फिटर राहुल घुमरे फिटर मुरली शंकर शिंदे पाणीपुरवठा कर्मचारी जिजाबाई बाबुराव आरसुळे स्वच्छता शिपाई निलाबाई किसन आरगडे स्वच्छता शिपाई कांताबाई देविदास किरवले स्वच्छता शिपाई

सुजीता रमेश किरवले स्वच्छता शिपाई अर्चना रमेश तूपसंदरे स्वच्छता शिपाई हे असे कर्मचारी यांच्यावर उपास मारीची वेळ येत आहे तरी लवकरात लवकर गट विकास अधिकारी व पंचायत समिती परळी वैजनाथ यांनी व ग्रामपंचायत कार्यालय शिरसाळा आमची मागील वेतन चालू वेतन देण्यात यावे ही नम्र विनंती करण्यात आली आहे.

# बंगालीपिंपळा ग्रामस्थांचा सौ. प्रियंकाताई शिवप्रसाद खेडकर यांना गेवराई विधानसभेसाठी वाढता पाठींबा

चकलांबा ।वार्ताहर

गेवराई विधानसभा मतदारसंघातील महत्त्वाचे समजले जाणारे गणाचे गाव म्हणजे बंगाली पिंपळगाव या गावांमध्ये साकाळी ०९:०० वाजता चकलांबा गावच्या कर्तव्यदक्ष सरपंच सौ प्रियंका ताई शिवप्रसाद खेडकर जनसंवाद मेळाव्याला बंगाली पिंपळा ग्रामस्थांचा उत्स्फूर्त पाठिंबा दिसून आला. गावातील सर्व ग्रामस्थ एकत्र येऊन ढोल ताशा वाजवून प्रियंका ताई खेडकर यांचे जंगी स्वागत केले. या जनसंवाद मेळाव्या च्या बैठकीमध्ये सर्व ग्रामस्थ तसेच गावातील महिला भगिनी एकत्र येऊन प्रियंकाताई शिवप्रसाद खेडकर यांनी येणारी विधानसभा निवडणूक लढवावी असा आदेश गावाच्या वतीने दिला. प्रियंका खेडकर ह्या मागील ८ महिन्यापासून चकलांबा गावाच्या सरपंच म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी चकलांबा गावाला मागील काही महिन्यामध्ये विकासाची दिशा दिलेली आहे. चकलांबा या गावाचा गेल्या आठ महिन्यांमध्ये झालेला कायापालट पाहून बंगाली पिंपळा व संपूर्ण परिसर प्रियंका ताई शिवप्रसाद खेडकर यांच्या कार्यावर प्रेरित झाला आहे

प्रियंका खेडकर या इडल इएव असून त्यांचे सासरे श्री भगवान तात्या खेडकर हे ३ वेळेस चे चकलांबा गटाचे सदस्य राहिलेले आहेत. भगवान तात्या खेडकर हे स्व. गोपीनाथ राव मुंढे साहेबांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात.

गावच्या आदेशाला उत्तर देताना प्रियंका खेडकर यांनी बंगाली पिंपळा गावात असणारे विविध प्रश्न रस्त्याचा,शिक्षणाचा,आरोग्याचा त्याचबरोबर गावात येणारे विविध शासकीय योजना यामध्ये घरकुल योजना च्या माध्यमातून पक्की घरे बांधून देण्याचा, जलसिंचन विहिरी,गाय गोठे अशा विविध प्रकारच्या योजना कसलेही प्रकारचा भ्रष्टाचार न होऊ देता सर्वांचा सर्वांगीण विकास करण्याचा शब्द बंगाली पिंपळा गावकऱ्यांना दिला तसेच तालुक्याने संधी दिली तर गेवराई



माजलगाव व बीड तालुक्यातील (सिंदफणा गोदावरी नदीच्या पट्ट्यातील) १लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी प्रयत्न करेल असे सांगितले. तसेच तालुक्यातील सर्व तांडे - वस्त्या २ वर्षामध्ये कॉंक्रिट रोड ने जोडून देईल असे सांगितलं. तसेच तालुक्यातील प्रत्येक गटाचे व गणाचे गाव एक वर्षात कॉंक्रिट रोड ने जोडणार असे सांगितले. सर्व समाजातील लोकांचे घरे ५ वर्षात पक्के करण्याचा निर्धार केला. पंचायत समितीत भ्रष्टाचार मुक्त करण्याचा निर्धार व्यक्त केला.

प्रियंका ताई च्या निर्णयाचे व दूरदृष्टीचे सर्व समाजातून कौतुक होत आहे व सर्व नागरिक त्यांना आमदार करण्यासाठी तालुका पिंजून काढतील असा शब्द दिला.

## निंबोडे येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाकडून मुलांची सुरक्षा रामभरोसे

### पालकांनी मुलांच्या सुरक्षेसाठी प्रश्न उपस्थित केल्यास त्यांना केली जाते

अरेरावेची ची भाषा

आष्टी ।प्रतिनिधी

बीड अहमदनगर जिल्ह्याच्या सरहद्दीवर वर असणारे सावरगाव तालुका आष्टी जिल्हा बीड या गावातील एकूण ३० विद्यार्थी निंबोडी येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयात शिक्षण घेत आहेत शेतकऱ्यांचे मुलं या शाळेत शिक्षणाचे धडे गिरवायला जातात परंतु या विद्यालयाकडून मुलांची कसलीच सुरक्षितता नसल्याचे आढळून येत आहे शाळेच्या सुरुवातीपासून सावरगाव येथील ही मुलं या शाळेत जात आहेत व सावरगाव इथून शाळेची बस निघाल्यानंतर निंबोडे पर्यंत जाई पर्यंत क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी बसवले जातातशाळेच्या बस मध्ये जातात परंतु या बसचे कोणतेही कागदपत्र नाहीत व मुलांच्या क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी या बस मध्ये बसवले जातात अशी तक्रार पालकांनी विद्यालयाच्या संस्थाचालकाला केली परंतु त्या तक्रारीला ते सतत केराची टोपली देत आहेत परंतु आरटीओ ऑफिस व्हाट्सअप द्वावरे निवेदन दिले आहे संरक्षण भेटावे जेवढी मुलांची क्षमता आहेत तेवढेच मुलाच्या बस मध्ये बसावेत मुलांच्या क्षमतेपेक्षा जास्त मुली या बस मध्ये बसवली जातातअशी पालकांनी बऱ्याच वेळा मागणी केली त्याचबरोबर पालकांनी शाळेमध्ये जाऊन संस्थाचालकाला विनंती केली परंतु संस्थाचालक मात्र पालकांना सतत तक्रार करताना पालकाचा अपमान करतात त्यामुळे या शाळेचे विद्यार्थी भाग्यवान मस्के यांचे पालक सामाजिक कार्यकर्ते अशोक शेठ मस्के यांनी याविषयी गटशिक्षण अधिकारी पाथर्डी बिडीओ कार्यालय पाथर्डी तहसीलदार कार्यालय पाथर्डी यांना या संस्थेविषयी व मुलांचे होणारे हेळसेंड या विषयी लेखी दि,२४/९/२०२४ रोजी निवेदनाद्वारे निवेदन दिले आहे आता अधिकारी या विद्यालयाबाबत काय भूमिका घेतात याकडे पालकांचे लक्ष लागून राहिल आहे

# अद्यावत क्रीडा संकुल सुरु करणार:आ नमितताई मुंदडा!!

प्रकाश मुंडे /बीड जिल्हा प्रतिनिधी

केज तालुका शालेय तालुकास्तरिय क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन आ. नामिताताई मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आले .या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गटशिक्षणाधिकारी श्री बेडस्कर साहेब तर प्रमुख पाहुणे म्हणून केज कृषि उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती डॉ वासुदेव नेहरकर,विधानसभा संयोजक शरद इंगळे,युवा नेते सुनील घोळवे,,सुरेश नांदे सर,पत्रकार रामदास तपसे, पत्रकार प्रकाश मुंडे संतोष जाधव, विकास जाधव, खद्दीर भाई कुरैशी हे उपस्थित होते. या वेळी बोलताना आ नामितताई मुंदडा म्हणाल्या की लवकरच तालुक्यातील मुलांना पिसेगाव येथे अद्यावत व सर्व सोयी असणारे क्रीडा संकुलचे काम लवकरच सुरू करणार आहोत त्यामध्ये स्वीमिंग टँक,रनिंग ट्रेकिंग, खो-खो,कब्बडी,टेनिस,फुटबॉल या सर्व खेळांचे अद्यावत ग्राउंड असतील व ते१ वर्षात पूर्ण होईल आसे आश्वासन आ. नमिता मुंदडा यांनी दिले .त्यांच्या हस्ते टॉस करून पाहिला सामना स्वामी विवेकानंद विद्यालय होळ विरुद्ध विश्ववनाथराव कऱ्हाड विद्यालय केज यांच्यात झाला या वेळी आ नामिताताई यांच्या वतीने मुलांना बिस्कीट व खाऊ वाटप करण्यात आला .क्रिकेट स्पर्धेत तालुक्यातील २३ संघांनी भाग घेतला होता. शालेय विद्यार्थी व क्रिकेट चाहते या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते..



## प्रहार चे दिव्यांग ॲट्रासिटी कायद्याचे फलक लावण्यासाठी पोलिस अधिक्षक बारगळ यांना निवेदन

किल्ले धारुर।प्रतिनिधी

दिव्यांग कायदा २०१६ नुसार असलेल्या परिपत्रकानुसार जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनला माहिती दर्शक फलक लावण्यासाठी प्रहारच्या वतीने पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांना निवेदन देण्यात आले आहे. दिव्यांग कलम ९२ मध्येष दिव्यांग व्यक्तींना अत्याचार,अन्याय,आरेवारी करणे, कायद्यानुसार सहा महिने कारावास किंवा पाच वर्षापर्यंत कारावास होऊ शकतो.असा हा कायदा आहे. बीड जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनला दिव्यांग कायद्या अंतर्गत २०१६ नुसार देण्यात आलेल्या परिपत्रकानुसार जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्टेशन दिव्यांग कायद्याचे माहिती परिपत्रक लावण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा सरचिटणीस हनुमंत तोंडे व प्रहार वडवणी चे तालुका सचिव संतोष राठोड यांनी पोलिस अधीक्षक बारगळ यांना दिले.



# महामार्गावर अनाधिकृत रित्या खोदलेले खड्डे प्रवाशांसाठी ठरत आहेत जीव घेणे!



आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील धामणगाव येथून बीड- अहमदनगर राज्य महामार्ग सोळा जातो. या महामार्गावर अनेक वर्ष बजेट न पडल्याने महामार्गावर खड्डेच-खड्डे झाले होते,अक्षरशः महामार्गाची चाळण झाल्याने परिसरातील जवळपास पन्नास गावातील जनतेला महामार्गावरून ये-जा करणाऱ्या फार मोठी डोकेदुखी वाढली होती,अहमदनगर वरून बीड जाणारे प्रवासी दूरवरून जामखेड मार्गे बीडला जात होते, परंतु २०१४ मध्ये माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या प्रयत्नाने ६९ किलोमीटरच्या या रस्त्यासाठी मोठ्या प्रमाणात बजेट उपलब्ध झाल्याने दौलावडगाव ते लिंबादेवी एवढा लांब हा रस्ता पूर्णपणे नवीन डांबरीकरण करून झाला, पण सध्या या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडायला सुरुवात झाली आहे, तर अनेक ठिकाणी काही लोकांनी अनाधिकृत पणे हा रस्ता खोदून ये -जा करणाऱ्या प्रवासाच्या गाडीला मोठा अपघात होईल अशा प्रकारे खड्डे केले आहेत, जर अशा प्रकारे अनाधिकृतपणे खोदून केलेल्या खड्ड्यामुळे उद्या एखाद्याच्या जीवितास हानी पोहोचल्यास त्याला जबाबदार कोण? असा सवाल नागरिकातून उपस्थित केला जात आहे,कारखेल बु. फाटा, व इतर अनेक ठिकाणी असे खड्डे खोदले आहेत त्यांच्यावर कारवाई करून, संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने ते खड्डे तात्काळ डांबर टाकून बुजवावेत अशी मागणी जनतेतून होत आहे.

## लिंबागणेश महसूल मंडळाची आढावा बैठक संपन्न

# तहसीलदार शेळकेंकडुन समस्यांचे निराकरण; शेतकरी ,ग्रामस्थ समाधानी :- डॉ.गणेश ढवळे




लिंबागणेश : आज दि.१ मंगळवार रोजी लिंबागणेश महसूल मंडळाची मंडळस्तरीय बैठक बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय लिंबागणेश येथे संपन्न झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळ अधिकारी अशोक डरपे यांनी केले.या बैठकीत प्रशासकीय योजना व प्रलंबित कामांचा आढावा घेण्यात आला. सदर बैठकीस लिंबागणेश मंडळातील पंचक्रोशीतील सरपंच व ग्रामस्थ मंडळ अधिकारी, तलाठी,कृषी सहाय्यक, ग्रामसेवक, बीएलओ, पर्यवेक्षक, स्वस्त धान्य दुकानदार, शेतकरी आदी उपस्थित होते. बैठकीच्या सुरूवातीला मंडळातील उपस्थित शेतकरी सर्वसामान्य लोकांच्या अडीअडचणी विचारून त्यावर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुचना दिल्या.तहसिलदार शेळके यांनी स्वतः समस्यांचे जागेवरच निराकरण करण्यासाठी पुढाकार घेतल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. तलाठी आणि ग्रामसेवक यांना पाणंद रस्त्यांची मोजणी, अतिक्रमण काढण्याच्या सुचना दिल्या.कृषी विभागातील कृषी सहाय्यक यांचेकडून अतिवृष्टीमुळे नुकसानीचे पंचनामे झाले असल्याची खात्री केली.अतिवृष्टीबाबतचे पंचनामे करणे,अ ब क ड या नमुन्यांमध्ये तलाठी व ग्रामसेवक यांनी मिळून वेळोवेळी संयुक्त अहवाल दाखल करणेबाबत सुचना दिल्या. उपस्थित ग्रामसेवक आणि तलाठी यांच्या कार्याचा आढावा घेतला. महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे व्यवस्थापक यांना थकीत पिककर्ज शेतकऱ्यांच्या बचत खात्याला होल्ड लाऊ नयेत असा सुचना दिल्या. महावितरणचे सहाय्यक अभियंता देशपांडे यांना महावितरण संबंधित समस्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या सूचना दिल्या. मस्के यांनी रेशीम तुती पालन विषयी माहिती दिली.

तहसीलदार शेळके यांचे बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती शांतीब्रम्ह तुकाराम महाराज लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, पोखरी ( घाट) चे सरपंच बिभीषण मुळीक, पिंपरनई सरपंच बाळासाहेब वायभट , ग्रामसेवक वीर, तलाठी पोतदार यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. लिंबागणेश पंचक्रोशीतील शेतकरी आणि ग्रामस्थांच्या वतीने डॉ.गणेश ढवळे यांनी तहसीलदार शेळके यांचे आभार मानले.

मुळुकवाडी -मसेवाडी शिवरस्त्याची मोजणी करण्याचे आदेश देऊन दिड वर्ष उलटूनही अद्याप मोजणी न केल्याने निधी परत गेला असुन रस्त्याच्या दुरावस्थेमुळे पावसाळ्यात शाळकरी मुले व ग्रामस्थांचे हाल होत असुन तातडीने मोजणी करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांच्यासह मसेवाडी ग्रामस्थांनी मांडल्यानंतर आठवडाभरात रस्त्याशेजारी व शेतजमीन मालकांना नोटीस बजावुन पोलिस संरक्षणात स्वतः जागेवर येऊन रस्त्याची मोजणी करून देण्याचे आश्वासन देत संबंधित अधिकारी

## साहीत्यरत्न आण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न सन्मान द्या साठी धारूर मध्ये

# मोर्चा तहसीलदारला निवेदन




धारूर / प्रतिनिधी

धारूर तालूक्यातील सकल मातंग समाज बाधव व मानवी हक्क अभियानचे वतीने साहीत्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे याना भारताचा सर्वोच्य भारतरत्न पुरस्काराने सन्मानीत करावे या मागणी साठी तहसील कार्यालया वर मोर्चा काढण्यात आला तहसीलदारला निवेदन देण्यात आले.साहीत्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे याना भारत सरकारणे सर्वोच्य असणारी देशातील भारतरत्न हा सन्मान देऊन त्यांचा गौरव करावा या मागणी साठी सकल मातंग समाज व मानवी हक्क अभियान यांचे वतीने तहसील कार्यालया वर मोर्चा काढण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून या मोर्चा सुरू करून घोषणा देत हा मोर्चा तहसील पर्यंत काढण्यात आला सासीत्यरत्न आण्णाभाऊ साठे यांचे कार्य हे उपेक्षीत दिन दलीत समाजाचे उन्नती करता होते साहीत्य व लोकशाहीरीतुन समाजात जागृती करण्याचे काम केले. त्याचे कार्याचा सन्मान सर्वोच्य भारतरत्न हा पुरस्कार देऊन करावा या मागणीचे निवेदन प्रभारी तहसीलदार सुरेश पाळवदे यांना देण्यात आले. यावेळी प्रमुख कार्यकर्त्यांनी आपले विचार व्यक्त केले. घोषणाणी तहसील परीसर दणाणूण गेला होता या मोर्चात मानवी हक्क अभियानचे तालूकाध्यक्ष कैलास आडागळे. युवा नेते सुरज लोखंडेआशोक पाटुळे, रामकिसन लोखंडे, अमोल लोखंडे, महादेव लोखंडे, अभिषेक आडागळे, ज्ञानोबा पाटुळे, धर्मराज लोंखडे, दिलीप लोखंडे, किरण लोंढे, माणीक लोखंडे, अमोल पाटुळे, सचिन पाटुळे, सह सकल मातंग समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

# ऊसतोड आई-वडीलांचे कष्टाचे चीज झाले पूर्ण; मुलगा बनला क्लासवन अधिकारी!

## गैबीनगर तांडा येथील दत्ता चव्हाणचा व्हिजेएनटी मधुन राज्यात दुसरा क्रमांक



गेवराई । नवनाथ आडे

गेवराई : तालुक्यातील गैबी नगर तांडा येथील ऊसतोड कामगाराचा मुलगा दत्ता दिनकर चव्हाण याने महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून व्हिजेएनटी मधुन राज्यात दुसरा क्रमांक मिळवला आहे.दरम्यान दत्ता चव्हाण याचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

गेवराई तालुक्यातील ग्रामीण भाग असलेल्या गैबी नगर तांडा येथील अल्प भूधारक शेतकरी दिनकर चव्हाण यांनी परीवाराच्या उदरनिर्वाहासाठी जिल्हा परजिल्ह्यातील विविध साखर कारखान्यासाठी २० ते २५ वर्षे ऊसतोड कामगार म्हणून काबाडकष्ट केले. पोटाला चिमटा घेऊन मुलांना शिक्षण दिले. एवढंच नाही तर मुलांच्या शिक्षणासाठी जवळपास पाच एक्कर शेती विकली. दरम्यान दत्ता याचे प्राथमिक शिक्षण तांड्यावरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत , माध्यमिक शिक्षण आश्रमशाळा वारोळा तालुका माजलगाव, उच्च माध्यमिक शिक्षण जय भवानी गढी येथे शिक्षण घेऊन औरंगाबाद येथे (छ. संभाजीनगर नगर) येथील जवाहरलाल नेहरू इंजिनिअरिंगला त्याचा नंबर लागला तेथे यश संपादन केले. दरम्यान मोठे भाऊ संजय चव्हाण यांची मी अधिकारी व्हावे अशी इच्छा होती. यासाठी मेहनतीने अभ्यास केला मला त्यांचेच मोलाचे मार्गदर्शन लाभले. दिल्ली येथे युपीएससी परीक्षेत मुख्य परीक्षेपर्यंत व मुलाखती पर्यंत झेप घेतली होती दरम्यान नंतर हार न मानता सन २०२० मध्ये लॉकडाऊन च्या काळात पुणे येथे सेल्फ स्टडी केली आणि २०२३ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धा परिक्षा दिली आणि नुकताच या स्पर्धा परीक्षेचा निकाल जाहीर झाला यामध्ये मी व्हिजेएनटी मधुन महाराष्ट्रातुन दुसरा क्रमांक मिळवला असून असिस्टंट कमिशनर कौशल्य विकास आणि उद्योजकता अधिकारी म्हणून निवड झाली आहे.

कोणत्याही प्रकारचे यश संपादन करत असताना जिद्द चिकाटी आणि मेहनत महत्त्वाची आहे. स्पर्धा परिक्षेचा मी दररोज जवळपास ९ ते १० तास अभ्यास केला असून स्पर्धा परीक्षेची तयारी करत असलेल्या विद्यार्थ्यांनी परिस्थितीची जाणीव ठेवून व जिद्द चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन करता येते असे दत्ता चव्हाण यांनी बोलताना सांगितले.

दत्ता यांना आई वडील, दोन भाऊ,दोन बहिणी असा परीवार आहे.मोठा भाऊ संजय चव्हाण हे बीड जिल्हा परिषदेत अकांऊट ऑफिसर या पदावर काम करत आहेत तर संतोष चव्हाण हे पंचायत समिती जालना येथे कार्यरत आहेत. दरम्यान बहिणीचे लग्न झालेले आहेत.

# नगर परिषदेच्या प्रशासक/ मुख्याधिकारी व अधिकाऱ्यांसोबत बीड शहर बचाव मंचाची बैठक संपन्न

## बैठकीमध्ये बीड शहर बचाव मंचाने केला शहरातील विविध भागातील समस्यांचा लेखाजोखा सादर



बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील सफाई मोहीम, पाणीपुरवठा, तातडीच्या दुरुस्त्या, मोकाट जनावरे व कुत्र्यांचे स्थलांतर, नाल्यांची दुरावस्था, सीसीटीव्ही कॅमेरे अवैध होर्डिंग्ज, औषध फवारणी, उद्याने, कर्मचारी भरती, कर्मचाऱ्यांचे वेतन आणि पेन्शन , नवरात्रसाठीची तयारी, धार्मिक स्थळांजवळचे रस्ते व लाईट, पथदिवे , पाणीपुरवठा, पी. टी.आर. नामांतर नोंदणी इतर नोंदणी प्रमाणपत्र कारभार , अशा अनेक विविध प्रश्नांसंबंधी बीड शहर बचाव मंच व मंचाच्या माध्यमातून जमलेल्या सामाजिक कार्यकर्ते व शहरातील प्रमुख नागरिक यांनी अगोदरच निश्चित केल्याप्रमाणे नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी व इतर अधिकारी कर्मचारी यांच्यासह तपशिलासह चर्चा- प्रश्न -उत्तरे व जबाबदारी अशा प्रकारे बैठक संपन्न झाली. मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी मात्र एक दोन अपवाद वगळता बहुतेक समस्या सोडवण्यासाठी निधी नाही, फंड नाही, शासनाकडून पैसा मिळत नाही, जिल्ह्यातील इतर तालुके व शहरांच्या तुलनेमध्ये बीडला पैसे मिळत नाहीत; हेच पालुपद गायिले. बीड शहर बचाव मंचाचे प्रमुख मार्गदर्शक डी.जी. तांदळे सर यांनी त्यांना जबाबदारीची जाणीव करून देत मंचाचे सहकार्य देवू केले. बीड शहर बचाव मंचाचे निमंत्रक नितीन जायभाये, अध्यक्ष कॉ. भाऊ प्रभाळे उपाध्यक्ष सय्यद फैयाज भाई इकबाल, सेक्रेटरी अशोकराव येडे, प्रमुख मार्गदर्शक डी जी तांदळे सर, संघटक फऱहानभाई सय्यद, सहसचिव सादेकभाई सय्यद, हाफिज मोईनुद्दीन शेख, कायदेशीर प्रमुख सल्लागार डव्होकेट अनिल बारगजे, ॲड नितीन वाघमारे, उपाध्यक्ष परवेज कुरेशी, अमजद कुरेशी, प्राचार्य नामदेव काळे सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, डॉ. गणेश ढवळे, प्रा. व्ही.एन.सवासे, सहसंघटक शेख अमीर पाशा, शेख जहीर, एस.टी. कामगार संघटनेचे सुधीर देशमुख, अर्जुनराव उजगरे, डॉ. मसलेकर यांच्यासह अनेक जबाबदार नागरिकांनी विषयनिहाय चर्चेत सहभाग नोंदविला.नगर परिषदेच्या वतीने मुख्याधिकारी नीता अंधारे, इंजी. प्रमोद माने, इंजी. दत्ता व्यवहारे, बांधकाम विभागाचे कर्मचारी, स्वच्छता विभागाचे प्रमुख विश्वंभर तिडके, स्वच्छता विभागाचे एसआय. जाधव, नोंदणी विभागाचे चंदु काळे, कुलकर्णी , उपमुख्याधिकारी सम्राट कदम, औषध फवारणीचे कर्मचारी अशा अनेक कर्मचाऱ्यांनी अधिकाऱ्यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.



# बलभीम नगर बुद्ध विहार येथे पप्पूजी कागदे साहेब यांनी भेट दिली

बलभीम नगर बुद्ध विहार शिवाजी नगर पालवन रोड बीड येथे रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा प्रदेश अध्यक्ष आदरणिय पप्पू जी कागदी साहेब यानी दिनांक ५/१०/२४ रोजी आर.पी.आय.चे अध्यक्ष रामदासजी आठवले साहेब यांना केंद्रांमध्ये तिसऱ्यांदा मंत्रीपद मिळाल्याबद्दल त्यांचा बीड मध्ये होणाऱ्या सत्कार समारंभा निम्मित कॉर्नर बैठकीचे आयोजन अक्षय जोगदंड यानी केले होते त्या वेळी ॲड तेजस वडमारे, सिद्धार्थ वडमारे, अक्षय जोगदंड, व महीला मंडळांनी बलभीम नगर बुद्ध विहार परिसरात असलेले अतिक्रमण हटवून लाईट ची व्यवस्था व केंद्रीय सामजिक न्याय मंत्री रामदासजी आठवले साहेब यांच्या फंडातून भरीव निधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावा, तसेच साध्य बीड रेल्वे स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावासाठी कायदेशीर लढाई करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव कसे देण्यात येईल यासाठी पप्पूजी कागदे साहेबांनी पुढाकार घेऊन प्रश्न मार्गी लावावा अशा विविध मागण्या केल्या आहेत त्यानंतर साहेबांनी आपण केलेल्या मागण्याचा पाठपुरावा करून लवकरच या विहरास निधी मिळवून देण्याचे आश्वासन दिलेले आहे, व बीड रेल्वे स्टेशनला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी लवकरच केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदासजी आठवले साहेब यांना निवेदन देणार असल्याचे सांगितले आहे,त्यानंतर त्याचे पुष्पहार घालून स्वागत केले त्यांच्या सोबत आरपीआयचे राजुजी जोगदंड,चांदणे साहेब, अविनाश भाऊ जोगदंड, महेश आठवले, भैय्या मस्के, वाडमारे साहेब हजर होते, या बैठकीस बलभीम नगर, मित्र नगर ,शिवाजीनगर परिसरातील सर्व बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका उपस्थित होते...

# ग्रामरोजगार सेवकांच्या मानधनात वाढ; रोजगार सेवकांना मिळणार आता आठ हजार रुपये मानधन




गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : राज्य मंत्रिमंडळाची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि.३० सप्टेंबर रोजी मंत्रालयात बैठक पार पडली. त्यामध्ये विविध खात्यांसह एकूण ३८ निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये ग्रामरोजगार सेवकांच्या मानधनात वाढ झाली असून आठ हजार रुपये मानधन तसेच प्रोत्साहन अनुदान त्यांना लागू होणार आहे. या निर्णयाबद्दल गेवराई पंचायत समितीसमोर ग्रामरोजगार सेवकांकडून फटक्यांची आतिषबाजी करत पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी ग्रामरोजगार सेवक कर्मचारी संघटनेचे तालुकाध्यक्ष जालिंदर शेजूळ, उपाध्यक्ष गंगाधर गलधर ,सचिव गौतम तुरुकमारे , भगवान आडागळे , नंदकुमार पौळ, शहाजी तौर , सुभाष लोंढे, नदीम शेख , सुदर्शन गाडे यांच्या सह तालुक्यातील रोजगार सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.राज्यातील महायुती सरकार निवडणुकीच्या तोंडावर अनेक महत्त्वाचे निर्णय घेत आहे. यामध्ये ग्राम रोजगार सेवकांना आता महिन्याला आठ हजार रुपयांचे मानधन दिले जाणार असून, प्रोत्साहन अनुदान मिळणार आहे. या निर्णयामुळं राज्यातील ग्राम रोजगार सेवकांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे. एकीकडे लाडकी बहीण योजनामुळे महिलांमध्ये आनंदाचे वातावरण असताना आता राज्य सरकार राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांसाठीसुद्धा अनेक महत्त्वाचे निर्णय घेताना दिसत आहेत. या निर्णयाबद्दल गेवराई पंचायत समितीसमोर ग्रामरोजगार सेवकांकडुन फटक्यांची आतिषबाजी करत पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी ग्रामरोजगार सेवक कर्मचारी संघटनेच्या

# पुरुषोत्तमपुरी येथील दलित वस्ती ट्रान्सफॉर्मर जळाल्यामुळे पंधरा दिवसापासून अंधारात

### दलित वस्तीचं एक सिंगल फेज ट्रान्सफॉर्मर गेलं चोरीला कोणी शोधून देता का? राजकीय पुढाऱ्यांकडून फक्त मतदानापुरताच वापर

माजलगाव ।प्रतिनिधी

पुरुषोत्तमपुरी येथील दलित वस्ती मधील सिंगल फेज ट्रांसफार्मर जळाल्यामुळे पूर्ण दलित वस्ती पंधरा दिवसापासून अंधारात आहे. तसेच या दलित वस्तीमध्ये तीन सिंगल फेज ट्रान्सफॉर्मर होते परंतु एक ट्रान्सफॉर्मर हे चोरीला गेले आहे ते कोणी शोधून देता का? असा सवाल दलित समाज बांधवांनी केला आहे कारण दोन ट्रान्सफॉर्मर जळाले तरी एका ट्रान्सफॉर्मरवर भागत होते ते पण चोरीला गेल्यामुळे मागील पंधरा दिवसांपासून दलित वस्तीला अंधाराचा सामना करावा लागत आहे पाऊस पडल्यामुळे मच्छरांचे प्रमाण खूप वाढले आहे. यामुळे लोकांना डेंगू, ताप, सर्दी खोकला अशा अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे लहान मुलांच्या आरोग्यावर याचा दुष्परिणाम होत आहे. या दलित वस्ती कडे राजकीय पुढारी फक्त मतदानापुरते बघत असतात सध्या गावात आजी-माजी भावी इच्छुक आमदारांचे जोरदार



दौरे चालू आहेत. पण या अंधाऱ्या वस्तीकडे बघून नाही बघितल्या सारखे करतात व दलित बांधवांचा फक्त मतापुरताच वापर करून घेतात. तसेच वेळेच्या वेळी बिलं भरून पण महावितरण वाले याकडे कसल्याही प्रकारचं लक्ष देत नाहीत फक्त लाईट कट करून दमदाटी करून लोकांकडून बिलं भरून घेतात महावितरणने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. जर याकडे लक्ष दिले नाही आणि चोरीला गेलेले ट्रान्सफॉर्मर शोधून दिले नाही तर दलित बांधवांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

## ना. अजित पवार यांच्या उपस्थित होणाऱ्या जनसन्मान यात्रेस हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे - आ. प्रकाश सोळंके, जयसिंग सोळंके

माजलगाव ।प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांची माजलगाव येथे मंगळवार दि. १ ऑक्टोंबर रोजी जनसन्मान यात्रा येणार आहे. त्यानिमित्त सकाळी दहा वाजता मंगलनाथ मैदान येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या जनसन्मान यात्रेस हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ. प्रकाश सोळंके व माजी जिल्हा परिषद बांधकाम सभापती जयसिंग सोळंके यांनी केले आहे.

महायुती सरकारने राज्यात जनहिताच्या अनेक योजना राबवल्या आहेत. या सर्व योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्या साठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते तथा उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांनी संपूर्ण



राज्यात दौरा काढलेला आहेत. त्या अनुषंगाने माजलगाव मतदार संघात जनसन्मान यात्रा मंगळवार दि. १ ऑक्टोंबर रोजी येत आहेत. यावेळी ना. अजित पवार यांच्या स्वागतासाठी पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून भव्य मोटार सायकल रॅली काढण्यात येणार आहे. यानंतर मंगलनाथ मैदान येथे सकाळी दहा वाजता जाहीर सभा होणार आहे. या कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे, ना. सुनील तटकरे, पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रूपालीताई चाकणकर, माजी आ.अमरसिंह पंडित, आ. आजबेकाका, मा. नगराध्यक्ष योगेश क्षीरसागर, पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश चव्हाण, यांच्यासह पक्षाच्या अनेक प्रमुख नेत्यांची उपस्थिती राहणार आहे. त्यामुळे माजलगाव मतदार संघातील नागरिकांनी या जनसमान यात्रेनिमित्त होणाऱ्या जाहीर सभेस हजारोंच्या संख्येने उपस्थिती लावावी. असे आवाहन आ. प्रकाश सोळंके यांच्यासह बीड जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती जयसिंग सोळंके यांनी केले आहे.

## वकफ मिळकती वाचविण्यासाठी सर्व मतभेद विसरून सर्वांनी एकत्र यावे

नाशिक ।प्रतिनिधी

( डॉ. शेरूभाई मोमीन ) पुणे येथे, स्व.जवाहरलाल नेहरू मेमोरियल हॉल, येथे संपूर्ण महाराष्ट्रातुन , ऑल इंडिया तहेरिके औकाफ तर्फे वकफ अमेनमेंट बिल संशोधन २०२४ च्या माध्यमातून एक दिवसाची कार्य शाळा, व भव्य समाज जन - जागृती समाजजोडो संकल्प अभियान अधिवेशन आयोजित केले होते. यावेळी, तहेरिके औकाफ चे राष्ट्रीयअध्यक्ष हाजी शब्बीर अन्सारी साहेब.बोलत होते. सदर या कार्यक्रमासाठी नागपूर येथून मा.सिनियर अँड.सरफराज मिर्झा नाशिक येथून, शेख हनीफ बशीर, राष्ट्रीय काँग्रेस अल्पसंख्यांक विभाग शहराध्यक्ष, जेष्ठ नेते,अँड.अन्सारभाई सैय्यद सर, सादिकभाई मोमीन, पत्रकार फैयाज पठाण, स्वाभिमानी सेना, नाशिक जिल्हाध्यक्ष जनसेवक डॉ. शेरूभाई सादिकभाई मोमीन, अतिक गाझी, फारूकभाई



बागवान. समाजसेवक शमुभाई सैय्यद, मोबीन मुलतानी, हुसेन अन्सारी, सिद्धीक अन्सारी, मजीद अन्सारी, आदम मोमीन,अल्ताफ पठाण, दाऊदभाई शेख, व.ईतर सर्व सदस्य,हितचिंतक, पदाधिकारी,कार्यकर्ते,नाशिक जिल्हाभरातिल समाजसेवक मोठया संख्येने यावेळी उपस्थित होते..



आमचे बंधु शेख ईसाक यांची नेकनुर पोलिस ठाण्यात पि एस आय पदी नियुक्ती झाली म्हणून दिलावर नगर भागातील हाफिज मन्सूर यांच्या घरी सत्कार ठेवण्यात आला होता या वेळी हाफिज मन्सूर यांनी शेख ईसाक यांचा सत्कार केला आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या या वेळी उपस्थित दै महाराष्ट्र आरंभ चे पेठ बिड प्रतिनिधी म्हणून जावेद पठान मला ही बोलविले होते या वेळी दिलावर नगर भागातील हाफिज मन्सूर शेख रईस टेलर शेख इक्बाल शेख आनसर शेख इस्माईल सलिम पठान शेख आनिस आदी उपस्थित होते

## कागदे साहेबांना विधानसभेत पाठवण्याकरिता समाजाने पूर्ण ताकतीने उपस्थित रहा -ॲड.धम्मानंद वाघमारे

बीड ।प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (-) बीड जिल्हा आयोजित मा. केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले साहेब यांचा सत्कार समारंभ दी. ५ ऑक्टोबर रोजी होणार आहे तरी आंबेडकरी विचारांच्या युवकांनी एकत्र येत आपली एकजूट दाखवल्याशिवाय आपले प्रश्न सुटणार नाहीत. आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या समाजासमोर अनेक प्रश्न उभे आहेत. आपले प्रश्न सोडविण्यासाठी आपण आपली एकजूट दाखवणे महत्वाचे आहे. आपली एकजूट दाखवली तरच शासनालाही आपण आपल्या मागण्या पुर्ण करुन घेण्यास भाग पाडू शकतो. त्यामुळे आंबेडकरी युवकांनी कुठल्याही अमिषाला बळी न पडता स्वाभिमान बाळगून एकत्र या, असे आवाहन युवा रिपाई प्रदेशाध्यक्ष पप्पूजी कागदे यांनी युवकांना केले आहे

रिपाईची चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी केंद्रीय मंत्री ना.रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली शेवटच्या



श्वासापर्यंत कार्य करीत राहील अशी ग्वाही प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे साहेब यांनी दिली आहे बीड जिल्हा रिपाईच्या वतीने ५ ऑक्टोबर रोजी केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा होणार असून स्वागत समारंभाच्या पार्श्वभूमीवर युवा नेते पप्पू कागदे हे बीड दौऱ्यातील प्रत्येक तालुक्यात आढावा बैठक घेत आहेत.तसेच महायुती मधील आपण एक महत्त्वाचे घटक पक्ष आहोत येणाऱ्या विधानसभेमध्ये कागदे साहेबांना आमदार झालेला बघण्याचे अनेक युवकांबरोबर धम्मानंद वाघमारे यांचे स्वप्न आहे त्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील तमाम आंबेडकरी समूहातील सर्व युवक जेष्ठ नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की आपण बीड जिल्हा रिपाईच्या वतीने ५ ऑक्टोबर रोजी भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन युवक रिपाई प्रदेशाध्यक्ष तथा रिपाईचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पूजी कागदे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येणार आहे. हा सत्कार सोहळा न भुतो न भविष्यती असा करण्यासाठी पप्पूजी कागदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली उपस्थित राहण्याची आवाहन करत आहोत मा. पप्पू जी कागदे साहेब हे स्वतःमागील १५ दिवसांपासून बीड जिल्ह्यातील प्रत्येक गाव, तालुक्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन आढावा बैठक घेत आहेत.

आबेडकरी चळवळ जिवंत ठेवायची असेल तर युवकांची ताकद महत्वाची आहे. युवकांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता आंबेडकरी विचार पुढे घेऊन जायचा आहे, आपली एकजूट महत्वाची आहे. आपला स्वाभिमान कुठेही गहाण न ठेवता प्रस्थापितांसमोर आपली ताकद दाखवून द्यायची आहे. आपली ताकद दिसली तरच आपले प्रश्न सुटतील, आपल्या समाजातील लोकांसमोर अनेक प्रश्न आहेत. तेव्हा आपली ताकत कायम एक ठेवा, केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली रिपाईची ताकद वाढवण्यासाठी व समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत अहोरात्र मेहनत घेत राहील येणाऱ्या ५ तारखेला मोठ्या संख्येने बीड येथे होणाऱ्या सत्कार समारंभास व पपुजी कागदे साहेबांना विधानसभेत पाठवण्यासाठी उपस्थित रहा असे आवाहन भीम दल संघटना प्रमुख तसेच रिपाई युवक जिल्हा उपाध्यक्ष ड.धम्मानंद वाघमारे यांनी केले आहे

## प्रिया डोईफोडे यांच्या प्रयत्नातून अचानक नगर भागातील सिमेंट रस्ता, नाली कामाचा शुभारंभ

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड उपजिल्हाध्यक्ष अविनाश भाऊ नाईकवाडे यांच्या हस्ते उद्धाटन संपन्न

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार धनंजय मुंडे यांच्या निधीतून तसेच राष्ट्रवादी काँग्रेस युवतीच्या जिल्हाध्यक्षा प्रियाताई डोईफोडे यांच्या प्रयत्नातून बीड शहरातील प्रभाग क्रमांक १८ येथील कनकालेश्वर मंदिर परिसरातील अचानक नगर भागात सिमेंट रस्ता आणि नाली कामाचे उद्धाटन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष अविनाश भाऊ नाईकवाडे यांच्या हस्ते दिनांक ३० सप्टेंबर रोजी संपन्न झाले.



या भागात अनेक दिवसांची मागणी आज युवती जिल्हाध्यक्ष प्रिया डोईफोडे यांच्या प्रयत्नातून पूर्ण झाल्यामुळे स्थानिक नागरिकांनी त्यांचा सत्कार करत आभार मानले. याप्रसंगी राष्ट्रवादी युवती उपजिल्हाध्यक्ष नुजत सिद्दीकी,युवती जिल्हा सचिव निता माळी, युवती शहराध्यक्ष मोहिनी ओव्हाळ, सय्यद मोहम्मद, शेख ताहेर भाई, सद्दा खान, शेख नविद, झैद कादरी यांच्यासह स्थानिक भागातील नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अचानक नगर हा परिसर विकास कामांपासून वंचित राहिलेला आहे. स्थानिक नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. याची दखल घेत राष्ट्रवादी युवती काँग्रेस च्या बीड जिल्हाध्यक्षा प्रियाताई डोईफोडे यांनी राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार धनंजय मुंडे यांच्याकडे अचानक नगर मधील रस्ता आणि नाली कामाची मागणी केली होती. धनंजय मुंडे यांनी देखील तत्काळ या रस्त्यासाठी २० लक्ष रुपयांचा निधी मंजूर केला.

आज या रस्ता आणि नाली कामाचे भूमिपूजन व कामाचा शुभारंभ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष अविनाश भाऊ नाईकवाडे यांच्या हस्ते संपन्न झाले. अविनाश भाऊ नाईकवाडे व युवती जिल्हाध्यक्ष प्रिया डोईफोडे यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व पालकमंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेऊन समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन दिले. यावेळी अचानक नगर भागात सिमेंट रस्ता आणि नाली बांधकाम होणार असल्याने स्थानिक नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद पहावयास मिळाला.

## पोलिस क्रीडा स्पर्धेत मुख्यालयाचा संघाने पटकावली सर्वाधिक परितोषिके

बीड ।प्रतिनिधी

जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. अविनाश बारगळ यांच्या मार्गदर्शनाखाली ३५ वी बीड जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धा-२०२४ दिनांक २६/०९/२०२४ ते ३०/०९/२०२४ दरम्यान कवायत मैदान, पोलीस मुख्यालय, बीड येथे आयोजीत करण्यात आल्या होत्या. सदर क्रिडा स्पर्धांचा समारोप व बक्षीस वितरण सोहळा आज दिनांक ३०/०९/२०२४ रोजी कवायत मैदान, पोलीस मुख्यालय बीड येथे पोलीस अधीक्षक श्री. अविनाश बारगळ यांचे शुभहस्ते पार पडला. सदर क्रिडा स्पर्धेमध्ये बीड उपविभाग, अंबाजोगई उपविभाग, आष्टी उपविभाग व पोलीस मुख्यालय असे चार संघ व ८२ खेळाडु सहभागी झाले होते. त्यामध्ये सर्वाधीक प्रथम क्रमांकासह बीड मुख्यालयाचा संघ विजयी झाला आहे. पुरुष गटातुन पो.अं. १९५६ युवराज पवार हे सर्वोत्कृष्ठ पुरुष खेळाडु तर महीला गटातुन म.पो.अं.२२२८ अर्चना आघाव



ह्या ३५ व्या बीड जिल्हा क्रिडा स्पर्धेच्या सर्वोत्कृष्ठ महीला खेळाडु ठरल्या आहेत. समारोप व बक्षीस वितरण सोहळ्यावेळी पोलीस अधीक्षक श्री. अविनाश बारगळ म्हणाले की, पोलीसांवर असलेला प्रचंड कामाचा ताण याचे व्यवस्थापन करण्यासाठी सर्वात प्रभावी उपाय म्हणजे व्यायाम, त्यामुळे प्रत्येक पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी खेळात रुची वाढवुन नियमीत व्यायाम करुन ताण-तणावाचे व्यवस्थापन करावे. तसेच पोलीस क्रिडा प्रकारात परिक्षेत्रीय, राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर बीड जिल्हा पोलीस दलाचा नाव लौकीक करावा. तसेच क्रिडा स्पर्धेच्या समारोप प्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी बीड श्री. विश्वांबर गोल्डे यांनी प्रास्ताविक सादर केले. बालगोपाळांच्या स्पर्धा तसेच पोलीस व पत्रकार यांच्यातील रस्सीखेच सामन्याने समारोप कार्यक्रमात रंगत आणली.

सदर क्रिडा स्पर्धा यशस्वी समारोप व बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी बीड उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विश्वांबर गोल्डे, राखीव पोलीस निरीक्षक श्री. पांडुरंग दलाई, पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख स्था.गु.शा., श्री. शितलकुमार बल्लाळ बीड शहर, श्री. मारुती खेडकर शिवाजीनगर बीड, सपोनि श्री. महादेव ढाकणे, भास्कर नवले, सचिन इंगळे, राखीव पोलीस उपनिरीक्षक श्री. बोंद्रे, तसेच पोलीस अंमलदार, पत्रकार बांधव व पोलीस कुटुंबीय मोठ्या प्रमाणात उपस्थीत होते.समारोप व बक्षीस वितरण सोहळ्या प्रसंगी राखीव पोलीस निरीक्षक श्री. पांडुरंग दलाई यांनी आभार व्यक्त केले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन योजनेतील लाभामध्ये दुप्पट वाढ; उत्पन्नाची अट रद्द

### मंत्रिमंडळाची मान्यता; कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची माहिती

मुंबई ।प्रतिनिधी

कृषी विभागाच्या वतीने अनुसूचित जाती, नवबौद्ध प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेअंतर्गत घटकांचे सुधारित निकष निश्चित करून आर्थिक लाभ वाढवण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी सिंचनाच्या शाश्वत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २०१७ पासून ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून जिल्हाधिकारी यांच्यामार्फत जिल्हा परिषदेचे निधी वितरित करण्यात येतो. रोजगार हमी योजनेअंतर्गत नवीन विहिरीसाठी चार लाख रुपये अनुदान दिले जाते मात्र त्या तुलनेत या योजनेतील लाभ घेण्यास लाभार्थी इच्छुक नसल्याचे दिसून आल्याने कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी योजनेतील लाभ वाढविण्याचे प्रस्तावित केले होते.

या योजनेचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी दीड



लाख वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेची अट रद्द करण्यात आली आहे विहिरीच्या खोलीची अट सुद्धा रद्द करण्यात आली आहे या योजनेचा लाभ घेण्यासाठी असलेल्या अनेक तांत्रिक अटींमध्ये भरपूर सवलती देण्यात आलेल्या आहेत.

मंत्रिमंडळाच्या मान्यतेमुळे आता अनुसूचित जाती नव बौद्ध प्रवर्गातील शेतकऱ्यांना नवीन सिंचन विहिरीसाठी २.५ लाख ऐवजी ४ लाख रुपये मिळतील. जुनी विहीर दुरुस्त करण्यासाठी ५० हजार ऐवजी १ लाख रुपये मिळतील. शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण करण्यासाठी १ लाख ऐवजी २ लाख मिळतील.

तसेच इनवेल बोरिंग साठी २० ऐवजी ४० हजार, वीज जोडणी आकार १० ऐवजी २० हजार, विद्युत पंप संच साठी २० ऐवजी ४० हजार, सोलार पंपसाठी ३० हजार ऐवजी ५० हजार, एचपीडीई पीव्हीसी पाईप साठी ५० हजार, तुषार सिंचन संच साठी २५ ऐवजी ४७ हजार, ठिबक सिंचन संच साठी ५० हजार ऐवजी ९७ हजार, तसेच तुषार सिंचन संच, ठिबक सिंचन पूरक अनुदान यातसुद्धा जमीन धारणेच्या प्रमाणात घसघशीत वाढ करण्यात आली आहे. या प्रस्तावास मान्यता दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार यांचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## महिला सबळीकरणासाठी एकनाथ शिंदे पुन्हा एकदा मुख्यमंत्री होणे काळाची गरज- शुभांगीताई नांदगावकर

### बीड शिवसेनेच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लाभार्थी महिलांचा मेळावा संपन्न!

बीड ।प्रतिनिधी

तळागाळातील माणसांची जाण असणारे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी आपल्या कार्यकाळात अठरा-अठरा तास काम करून सामान्य जनतेच्या भल्यासाठी मोठमोठी आणि लोकांभिमुख निर्णय घेतले आहेत. यात सर्वात महत्वाचे म्हणजे महिला सबळीकरणासाठी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, माझी लाडकी बहीण योजना, बस प्रवासात पन्नास टक्के सवलत असेल अशा अनेक महिलांसाठीच्या उपयुक्त योजना शिंदे साहेबांनी राबविल्या आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिला मुख्यमंत्री असा आहे ज्यांनी महाराष्ट्रभरातील महिलांना माझी लाडकी बहीण म्हणून हाक देत सन्मान दिला आहे. महिलांचा सन्मान आणि महिलांचे सबळीकरण हा ध्यास घेऊन आपली वाटचाल करणारे एकनाथजी शिंदे साहेब




महाराष्ट्र भल्यासाठी, महिला सबळीकरणासाठी पुन्हा एकदा मुख्यमंत्री होणे काळाची गरज आहे त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व महिलांनी आपल्या लाडका भाऊराया असणाऱ्या शिंदे साहेबांना येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत विजयी करून पुन्हा एकदा मुख्यमंत्री बनविण्यासाठी मोठ्या ताकदीने उभे राहायचे आहे असे शिवसेना मराठवाडा संपर्कप्रमुख विधानसभा समन्वयक शुभांगीताई नांदगावकर यांनी प्रतिपादन केले.

बीड शिवसेनेच्या वतीने काल दि. २९ सप्टेंबर रोजी बीड शहरातील हॉटेल नीलकमल, पेठ बीड भागातील बालाजी मंदिर सभागृह तसेच बीड मतदार संघातील ढेकनमाहू या गावात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लाभार्थी महिलांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यासाठी शिवसेना मराठवाडा संपर्कप्रमुख विधानसभा समन्वयक शुभांगीताई नांदगावकर, सह संपर्कप्रमुख अंजलीताई मांडवकर यांची विशेष उपस्थिती होती. शुभांगीताई नांदगावकर, अंजलीताई मांडवकर यांच्यासह बीड शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक या सर्वांनी उपस्थित महिलांशी मुक्त संवाद साधत त्यांच्या समस्या अडचणी समजून घेतल्या. येणाऱ्या काळात महाराष्ट्र राज्याच्या हितासाठी मुख्यमंत्री शिंदे साहेब हे मुख्यमंत्री असणे अत्यावश्यक असल्याची भावना महिला-भगिनींसमोर व्यक्त केली. दरम्यान उपस्थित महिला-भगिनींनी देखील जोरदार टाळ्या वाजवत शिंदे साहेबच मुख्यमंत्री व्हावे असा कौल दिला. दरम्यान उपस्थित महिलांना साडी वाटप करण्यात आले. या मेळाव्यासाठी शिवसेना महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लाभार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT